आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता
२५ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- भारताला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्यात महिलांचा मोठा वाटा असल्याचे प्रधानमंत्र्यांचे प्रशंसोद्गार/ जळगावमधल्या कार्यक्रमात देशभरातल्या ११ लाख नव्या लखपती दीदींचा प्रमाणपत्र देऊन केला गौरव
- विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी समर्पणाच्या भावनेची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन
- नेपाळ दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय, मार्च २०२४ पासून होणार अंमलबजावणी

  **आणि**
- राज्याच्या अनेक भागात जोरदार पावसामुळे विविध धरणांमधून विसर्ग सुरु / पालघर, रायगड, रत्नागिरी, नंदुरबार, पुणे, सातारा जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट

**<><><><><>**

देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याच्या वाटचालीत महिलांचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जळगावमध्ये आज झालेल्या लखपती दिदी संमेलनात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज देशभरातल्या ११ लाख नव्या लखपती दीदींना, प्रतिकात्मक स्वरुपात प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला गेला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षांत १ कोटी लखपती दीदी झाल्या आहेत, तर गेल्या दोन महिन्यात त्यात आणखी ११ लाख लखपती दीदींची भर पडल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

नेपाळ दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली. केंद्र सरकारनं कोकणाचाही विचार करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महिला मुख्य प्रवाहात आल्या, तरच विकसित भारताचं स्वप्न साकार करता येईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. तर राज्यात ५० लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचा संकल्प करू या, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

या संमेलनापूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी देशातल्या निवडक ८० लखपती दिदींशी संवाद साधला आणि योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाविषयी त्यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतलं.

**<><><><><>**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राजकीय पार्श्वभूमी नसतानाही अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिलं, विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी आज अशाच भावनेची गरज आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११३ वा भाग होता.

आज  मोठ्या संख्येनं युवा राजकारणात यायला तयार आहेत, त्यांना केवळ योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधीची गरज आहे, असं त्यांनी सांगितलं. युवकांनी या अभियानात स्वतःला जोडून घ्यावं, असं आवाहन करतानाच, युवकांचं हे पाऊल देशाचं भविष्य बदलून टाकणारं ठरेल, असं ते म्हणाले.

यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राबवलं गेलेलं हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या निमित्तानं देशभरात अभिनव पद्धतीनं काढलेल्या तिरंगा यात्रांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. जेव्हा लोक एकत्र येऊन आपल्या भावना प्रकट करतात तेव्हा अशा प्रकारची अभियानं प्रचंड यशस्वी होतात असं ते म्हणाले. या अभियानानं संपूर्ण देशाला एका सूत्रानं बांधलं असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री- एक भारत श्रेष्ठ भारत**

आजच्या मन की बात मधून प्रधानमंत्र्यांनी प्राणी तसंच पर्यावरण संवर्धन आणि रक्षणासाठी देशभरात सुरु असलेल्या काही अभिनव प्रयत्नांची, आणि अशा प्रयत्नांत योगदान देत असलेल्या तंत्रज्ञानाधारीत स्टार्ट अप्सची उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली. या क्षेत्रात अधिकाधिक स्टार्ट अप्स येऊ लागले तर त्यामुळे पशुपक्ष्यांच्या संरक्षणासोबतच, परंपराही टिकून राहतील, असं ते म्हणाले. आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर पर्यावरणाचं रक्षण होईल आणि देशही पुढे जाईल, असं ते म्हणाले.

मुलांचं पोषण ही देशाची प्राथमिकता असल्यानं मुलांना योग्य पोषण आहार मिळावा म्हणून सरकार राबवत असलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. प्रत्येकानं आपल्या क्षेत्रातल्या पोषणविषयक जागरूकता अभियानांशी जोडून घेण्याचं आवाहन त्यांनी केलं.

नुकताच २३ ऑगस्टला देशानं पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा केल्याचं सांगताना, त्यांनी मागच्या वर्षी याच दिवशी भारताचं चांद्रयान तीन चंद्राच्या दक्षिण भागात शिव - शक्ती पॉइंट इथं यशस्वीपणं उतरल्याच्या कामगिरीला उजाळा दिला. यानिमित्तानं त्यांनी अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या गॅलेक्स आय या स्टार्ट अपच्या चमूशीही संवाद साधला.

एक पेड मां के नाम या अभियानाची आठवण करून देत, प्रत्येकानं जास्तीत जास्त झाडं लावण्याचं - त्यासाठी इतरांना प्रोत्साहन देण्याचं, आवाहनही त्यांनी आजच्या मन की बात मधून केलं.

<><><><><>

केंद्र सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करायला राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक झाली. मार्च २०२४ पासूनच याची अंमलबजावणी होणार असून लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा मिळेल.

शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. नार - पार - गिरणा नदी जोड प्रकल्पालाही सरकारनं आज मंजुरी दिली. ७ हजार १५ कोटी रुपयांच्या या प्रकल्पानं नाशिक, जळगाव जिल्ह्याला मोठा फायदा होईल. खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान पर्यायी बोगदा काढायलाही मंत्रिमंडळाची आज मंजुरी मिळाली. यामुळं पुणे परिसरात सिंचन, पिण्यासाठी अधिक पाणी उपलब्ध होईल.

आरोग्य खात्यातल्या गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची वाढ करायला मंत्रीमंडळाच्या आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या ३० ऑगस्टपर्यंत करायचा निर्णयही आज झाला. मुंबई महानगरात रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना झपाट्याने पूर्ण करण्याची जबाबदारी विविध महामंडळांकडे दिली जाणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी महामंडळ स्थापन करायला आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली. याचा लाभ सव्वा कोटी ज्येष्ठ नागरिकांना होईल.

<><><><><>

राज्यात विविध ठिकाणी मुसळधार पाऊस सुरु असून बहुतांश धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

**नवी मुंबई** महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाली असल्यानं धरणातलं अतिरिक्त पाणी धावरी नदीत सोडलं जाईल, असं नवी मुंबई महानगरपालिकेनं सांगितलं आहे. त्यामुळे धावरी आणि पाताळगंगा नदीजवळच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**पालघर** जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू आहे. सततच्या पावसामुळे धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

**नाशिक** जिल्ह्यात गंगापूर धरणातून ८ हजार ४२८ क्युसेक, दारणा धरणातून १४ हजार ४१६, नांदूर मधमेश्वरमधून ५२ हजार ३०८ तर पालखेड धरणातून कादवा नदीमध्ये ८३० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. नाशिक शहरात मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला पूर आला आहे. नदीच्या इशारा पातळीपर्यंत पाणी आल्यानं नाशिक महापालिकेनं नदीकाठच्या नागरिकांना तातडीनं स्थलांतरित होण्याचं आवाहन केलं आहे. सुरगाणा तालुक्यात मौजे बोरचोंड इथं मुसळधार पावसामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

**कोल्हापूर** जिल्ह्यात सुरु असलेल्या पावसामुळे राधानगरी धरणाचे चार दरवाजे उघडले आहेत. धरणातून ७ हजार २१२ क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**सातारा** जिल्ह्यात विविध भागात मुसळधार पाऊस सुरु आहे.

**नंदुरबार** जिल्ह्यात सुरु असलेल्या पावसामुळे विरचक्क धरण पूर्ण क्षमतेनं भरलं आहे. गेली दोन वर्ष दुष्काळामुळे रिकाम्या असलेल्या विरचक्क धरणातून दोन वर्षानंतर पाणी सोडलं जाणार असल्यानं शीवन नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**धुळे** जिल्ह्यात पांझरा नदीवरच्या अक्कलपाडा प्रकल्पाच्या धरणातून आज दुपारपर्यंत १५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे पांझरा नदीला पूर आला आहे. नदीच्या पुरात एक तरुण वाहून गेला आहे. भात नदीला पूर आल्यानं तिसगाव धंदाणे गावाचा पूल पाण्याखाली गेला असून गावाचा संपर्क तुटला आहे.

**<><><><><>**

पुढचे दोन दिवस कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. **उत्तर मध्य महाराष्ट्रात** तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. **मराठवाडा आणि विदर्भात** तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. **पालघर, रायगड, रत्नागिरी, नंदुरबार, पुणे, सातारा** या जिल्ह्यांना हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे.

**<><><><><>**